# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२१०४८८/२१/अ.क्र.५९३५/२४

**श्री. नरेश म्हात्रे**
डी/३३, सायन अगरवाडा, स्किम-६,
रोड नं.२९, सायन, मुंबई-४०० ०२२.
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी पर्यवेक्षक ग्राहक सेवा विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर बेस्ट उपक्रम, ६ वा मजला,
न्यू ॲन्सीलरी बिल्डींग, गेट नं. ६, वडाळा, मुंबई – ४०००३१.
**प्रथम अपीलीय अधिकारी अधिक्षक, ग्राहक सेवा विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर बेस्ट उपक्रम, ६ वा मजला,
न्यू ॲन्सीलरी बिल्डींग, गेट नं. ६, वडाळा, मुंबई – ४०००३१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. २६.११.२०२४ रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.१०.२०२० | २७.१०.२०२० | १०.११.२०२० | ०६.०१.२०२१ |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.२७-१०-२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.०६-०१-२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि.०९-०२-२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.०२.१०.२०२० अन्वये Customer No.659-181-011*1, Contract No.1985850 च्या पत्ताबदल विषयी माहितीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी ग्राहक सेवा (एफ/एन) यांनी दि.२७.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१०.११.२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, ग्राहक सेवा (एफ/एन) यांनी दि.०६.०१.२०२१ रोजी As per our Consumer Information System no authority or persons has provided any documents to change the billing address for consumer no. 659-181-011 in the year 2019

2020. The abbreviation R- stands for Room no., F- stands for Floor, and W- stands for Wing, P-stands for plot in the electricity bill of Shri N. Y. Mhatre असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०९.०२.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, ग्राहक सेवा विभाग श्रीमती मारीयम राजन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, ग्राहक सेवा विभाग श्रीमती माधुरी उगले उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगास सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, ग्राहक सेवा विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, ग्राहक सेवा विभाग श्रीमती मारीयम राजन यांनी आयोगास सादर केले आहे की, जो पर्यंत ग्राहकाकडून पत्ता बदलण्याविषय अर्ज येत नाही तो पर्यंत ग्राहकाच्या पत्त्यात बदल होत नाही.

अपीलार्थी यांनी आयोगास असे सादर केले की, मी अर्ज न करता माझ्या विजदेयकावरच्या पत्त्यात वारंवार बदल होत आहे म्हणून त्यांनी कोणत्या आधारावर पत्ता बदलण्यात येतो या विषयी माहिती विचारलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, ग्राहक सेवा विभाग यांनी माहिती दिलेली आहे. तरीही विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, ग्राहक सेवा यांनी विजदयेकावरील पत्ता बदलण्या विषयीच्या कार्यपध्दतीची माहिती अपीलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्तीच्या १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाने देण्यात यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १७.१२.२०२४**

State Information Commission * Maharashtra *

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**